# Gurukilli Pre - Primary school

**(Nursery, LKG, UKG)**

## (महाराष्ट्र आणि गोवा राज्यासाठी)

# शिक्षक पाहिजेत

गुरुकिल्ली ॲकॅडमी प्रा. लि. (**CIN No. U80102MH2015OPC262477**) बीड वतीने महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील राज्यातील शहरी व ग्रामीण भागात 3 ते 6 वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी गुरुकिल्ली ॲकॅडमी प्रा. लि. संचलित Gurukilli Pre – Primary school (**Nursery, LKG, UKG**) सुरु करण्यात येत आहेत याकरिता www.stategkexam.com या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने तसेच विहित नमुन्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

यासाठी महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील प्रत्येक ग्रामीण व शहरी भागात खालील कर्मचा-यांची नियुक्ती करणे आहे.

| क्र. | पद | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | वेतन/मोबदला रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षक / शिक्षिका | प्रत्येक ग्रामीण भागात एक पद | D.Ed / B.Ed ग्रॅज्युएशन. महिलांना व अनुभवास प्राधान्य | जिल्हा: 7,000/-<br>तालुका: 6,000/-<br>गाव: 5,000/- |
| 2 | मार्केटिंग ऑफिसर | प्रत्येक ग्रामीण भागात एक पद | 12 वी पास. ग्रॅज्युएशन असल्यास प्राधान्य | 6000/- प्रती माह + 3000/- रु. प्रवासभत्यापोटी |
| 3 | शिपाई (दाई) महिलांना प्राधान्य. | प्रत्येक ग्रामीण भागात एक पद | 7 वी पास | जिल्हा: 2,500/-<br>तालुका: 1,800/-<br>गाव: 1,500/- |
| 4 | ड्रायव्हर | 10 पेक्षा जास्त | 10 वी पास तीन चाकी चार चाकी वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक | 5000/- रु. + वाहन भत्ता (किराया) |
| 5 | शाळा निरीक्षक तालुका | 370 | पदवीधारक | **वार्षिक मोबदला 2 लक्ष रुपयांपर्यंत (कमिशन तत्वावर)** |
| 6 | शाळा निरीक्षक जिल्हा | 30 | पदवीधारक | **वार्षिक मोबदला 2 लक्ष रुपयांपर्यंत (कमिशन तत्वावर)** |
| 7 | Pre-Primary school फ्रान्चायजी प्रमुख | 370 | पदवीधारक | **वार्षिक मोबदला 2 लक्ष रुपयांपर्यंत (कमिशन तत्वावर)** |

## कामाचे स्वरुप

1) **शिक्षक / शिक्षिका :-** 3 ते 6 वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांना शिकविणे. तसेच शिकवणी वेळे मध्ये मुलांची काळजी घेणे, मुलांचे प्रवेश करणे, सर्व्हेसाठी मदत करणे.
2) **मार्केटिंग ऑफिसर :-** मुलांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा सर्वे करणे, विद्यार्थ्यांचे प्रवेश करणे, ग्रामीण भागात प्रवेशासाठी कार्यक्रम राबविणे, शाळेसाठी जागेची व्यवस्था करणे.
3) **शिपाई (दाई) :-** शाळेची स्वच्छता करणे, मुलांची काळजी घेणे
4) **ड्रायव्हर :-** मुलांची ने – आण करणे, या पदासाठी स्वता:चे वाहन असणा-यास प्राधान्य देण्यात येईल.(यासाठी वाहनभत्ता /भाडे खर्च वेगळा देण्यात येईल.)
5) **शाळा निरीक्षक तालुका :-** तालुक्यात सुरु होणा-या सर्व शाळेवर नियंत्रण ठेवणे, शिक्षकांच्या अडी-अडचणी दुर करणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष देणे, शिक्षकांच्या रजा मंजुर करणे, शाळेसाठी शिक्षकांची व इतर कर्मचा-यांची आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती करणे तथा कंपनीची वेळोवेळी सांगण्यात आलेली कामे पाहणे.
6) **शाळा निरीक्षक तालुका :-** जिल्ह्यात सुरु होणा-या सर्व शाळेवर नियंत्रण ठेवणे, शिक्षकांच्या अडी-अडचणी दुर करणे, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष देणे, शिक्षकांच्या रजा मंजुर करणे, शाळेसाठी शिक्षकांची व इतर कर्मचा-यांची आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती करणे तथा कंपनीची वेळोवेळी सांगण्यात आलेली कामे पाहणे.
7) **Pre-Primary school शाखा / फ्रान्चायजी प्रमुख :-** आपल्या मनपसंतीच्या ठिकाणी Gurukilli Pre – Primary school (Nursery, LKG, UKG) स्कुल सुरु करणे, यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नियमाप्रमाणे नियुत्ती करणे.

**वयोमर्यादा :- सर्व पदासाठी किमान वयोमर्यादा 18 वर्ष पूर्ण व तसेच जास्तीत जास्त वयाची अट नाही.**

| **ज्या ठिकाणा शाळा सुरु करावयाची आहे त्या विभागानुसार गावाची अंदाजे संख्या** | | |
|---|---|---|
| **क्र** | **विभाग** | **संख्या** |
| 1 | औरंगाबाद | 5609 |
| 2 | नाशिक | 4891 |
| 3 | अमरावती | 3945 |
| 4 | मुंबई | 2833 |
| 5 | पुणे | 5669 |
| 6 | नागपूर | 3682 |
| 7 | गोवा | 50 + |

टीप :- सदरील विभागानुसार दिलेली शाळेची संख्या ही प्रत्येक गावात 1500- 2000 पेक्षा लोकसंख्या आहे या पध्दतीने अंदाजे देण्यात आलेली आहे. लोकसंख्येनुसार यात कमी – अधिक करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे.

**नियम व अटी भाग – 01**

1) **सदरील सर्व Gurukilli Pre – Primary school या 01 जुन पासून सुरु होतील. कालावधी 01 जुन ते 30 मे असा राहिल. वेळ – साधारणत: सकाळी 10 ते 2 वाजेपर्यंत.**
2) पद क्र. 2 हे तात्पुरत्या स्वरुपात असून (3 महिने कालावधीसाठी) 01 एप्रिल ते 30 मे या कालावधीमध्ये संबंधित कर्मचा-यांनी दिलेले काम करणे गरजेचे आहे. परंतु काम समाधानकारक वाटल्यास नियुक्ती कायम करण्यात येईल. सदरील पदासाठीची नियुक्ती ही 01 एप्रिल पासून राहिल.
3) मार्केटिंग ऑफिसर पदासाठी दिलेल्या वेळेत टार्गेट पूर्ण करणे गरजेचे आहे. टार्गेट पूर्ण न झाल्यास कोणताही मोबदला देणे कंपनीवर बंधनकारक राहणार नाही परंतु कामाच्या आढाव्यानुसार प्रवास भत्ता देय राहिल.
4) तथा पद क्रमांक 01, 03 तसेच 04 या पदांची नियुक्ती ही 01 जुन पासून राहिल.
5) गरजेनुसार नियुक्ती कालावधी पुढे मागे ढकलण्याचा अधिकार हा राखुन ठेवण्यात आला आहे.
6) सदरील सर्व नियुक्ती ही प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येईल. परंतु मुलाखत न घेता कर्मचा-यास नियुक्ती देण्याचा अधिकार हा राखुन ठेवण्यात आला आहे.
7) ग्रामीण भागातील शिक्षकाच्या नियुक्तीचा विचार करता शिक्षकास ज्या गावची लोकसंख्या किमान 1500 ते 2000 आहे अशा लोकसंख्येच्या गावासाठी एक शिक्षक नियुक्त करण्यात येईल.
8) **सदरील नियुक्त शिक्षकांना शाळेवर काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या मदतनिसची नियुक्ती कंपनीच्या माध्यमातुन न झाल्यास सदरील नियुक्ती करण्याचा अधिकार हा शिक्षकांस देण्यात येईल.**
9) तसेच मुलांच्या प्रवेशासाठी मार्केटिंग ऑफिसर या पदाची नियुक्ती न झाल्यास सदरील काम हे शिक्षकास करावे लागेल, सदरील पदाचा मोबदला शिक्षकास देय राहिल.
10) सदरील शाळेमध्ये इंग्रजी तसेच मराठी माध्यमाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांस देण्यात येईल.
11) सुट्टीचा विचार करता प्रत्येक शिक्षकास / शाळेस शासकीय नियमाप्रमाणे असलेल्या सुट्टया देय राहतील परंतु दिपावली आणि उन्हाळा काळातील जास्त सुट्या शिक्षकास देय राहणार नाहीत. (दिपावली/उन्हाळा अनुक्रमे 10 - 10 दिवस)
12) **नियुक्तीसाठी प्रथम येणा-या कर्मचा-यास प्राधान्य देण्यात येईल परंतु लोकसंख्यानुसार त्यास जागेसाठी कंपनीच्या नियमाप्रमाणे प्रतिक्षायादीसाठी जादा कर्मचा-याची नियुक्ती देण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे.**
13) प्रतिक्षायादीवर नियुक्त कर्मचा-यास सुध्दा नियमाप्रमाणे कंपनी बरोबर करार करावा लागेल. सदरील कर्मचा-यास 90 दिवसांच्या आत नियुक्ती देण्यात येईल अन्यथा त्यांनी भरलेले डिपॉझिट त्यांना चेकद्वारे परत करण्यात येईल.
14) ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांनी सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज दि. 30 मार्च, 2018 पर्यंत **संचालक, गुरुकिल्ली ॲकॅडमी प्रा. लि., शाहु नगर, हनुमान मंदिर रोड, नवजीन शिक्षक पतसंस्था दुसरा मजला, जि. बीड. फोन 02442 – 22122 / 233393** या पत्यावर पाठवावेत.
15) अर्ज भरण्यासाठी ऑनलाईन अर्ज फिस ही 200 रु. आकारण्यात येत आहे. **मुलाखतीसाठी कोणतही फिस आकारण्यात येणार नाही.**
16) सदरील फिस ही ना परतावा असून ही फिस ऑनलाईन तसेच ऑफलाईन भरु शकतो. ऑफलाईन फिस ही उमेदवारांने खाली दिलेल्या बँक खात्यावर भरणे आवश्यक आहे.

**Bank Name : BANK OF INDIA**
**Branch : Anandwadi**
**A/c No. 07612 011 0000 301**
**Account Name : Gurukilli Academy Pvt. Ltd.**
**IFSC Code : BKID0000761**

17) शिक्षकास/शिक्षिकेस मोबदला हा 01 जुन, 2018 पासून देण्यात येईल. परंतु प्रत्येक शिक्षकाच्या वेतनातुन प्रती माह 10 टक्के रक्कम कपात करुन भविष्य निर्वाह निधी पोटी संबधित शिक्षकाच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल सदरील रक्कम शिक्षकास कंपनीच्या पूर्व परवानगी शिवाय काढता येणार नाही.

18) **प्रत्येक नियुक्त कर्मचा-यास कंपनीबरोबर 100 रु.च्या मुद्रांक पेपरवर करार करावा लागेल. यासाठी 1000/- (अक्षरी – एक हजार रु.) अनामत रक्कम घेण्यात येईल.** **(सदरील रक्कम ही परतावा राहिल.)** (यातुन 100 रु. करार पोटी कपात करण्यात येतील.)

19) **परंतु पद क्रमांक 2 शिपाई पदासाठी कोणतेही डिपॉझिट भरण्याची गरज नाही.**

20) विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी संबधीत भागात सर्व्हे करण्याची जबाबदारी ही मार्केटिंग ऑफिसर, शिक्षकांची राहिल. विद्यार्थ्यांने / पालकाने भरलेल्या फिसची संबंधितास पावती देणे तथा विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज भरुण घेण्याची सर्वस्वी जबाबदारी ही मार्केटिंग ऑफिसर, शिक्षकाची राहिल.

21) युनिट, शाखा, शाळा सुरु न केल्यास किंवा एकही विद्यार्थ्यांचा प्रवेश न झाल्यास कोणताही लाभांश शिक्षकास मिळणार नाही.

22) कंपनीच्या माध्यमातुन सुरु करण्यात येणा-या Gurukilli Pre – Primary school (Nursery, LKG, UKG) सुरु करण्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक साहित्य जसे लेखणी फळा (बोर्ड), बॅनर, मार्कर पेन, विद्यार्थ्यांना पाटी – पेन्सिल, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक खेळणी व इतर साहित्य तसेच जागेचा किराया वेळेवर कंपनीच्या माध्यमातुन कर्मचा-यापर्यंत पोहचवु न शकल्यास नियमाप्रमाणे **विद्यार्थ्यांच्या जमा झालेल्या फिस मधुन सदरील खर्च करणे याची संम्मती/अधिकार मार्केटिंग ऑफिसर, शिक्षकास देण्यात येईल.**

23) सर्व खर्चाचा विचार करता कंपनीच्या माध्यमातुन मोठे शहर, मध्यम शहर आणि ग्रामीण भाग यामध्ये ‘अ’, ‘ब’, ‘क’ या गटामध्ये करण्यात येत आहे. एका युनिटमध्ये **किमान 40 ते 45** विद्यार्थी संख्या आवश्यक आहे यासाठी खालील पध्दतीने खर्च देय राहिल.

24) **विद्यार्थी संख्येअभावी दिलल्या खर्चामध्ये कमी – अधिक करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात आला आहे.**

**अ) 40 ते 45 पर्यंत विद्यार्थी संख्या असल्यास**

| क्र. | तपशिल | ‘अ’ | ‘ब’ | ‘क’ |
|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षक/शिक्षिका मानधन प्रती माह (12 महिने) | 7,000 | 6,000 | 5,000 |
| 2 | जागा किराया प्रती माह (12 महिने) | 7,000 | 4,500 | 2,000 |
| 3 | दायी (काम करण्यासाठी) | 2,500 | 1,800 | 1,500 |
| 4 | खेळणी, रंग प्रती वर्ष | 5,000 | 4,000 | 3,000 |
| 5 | जाहिरात | 10,000 | 8,000 | 4,000 |
| 6 | शैक्षणिक साहित्य प्रती विद्यार्थी | 250 | 200 | 150 |
| 7 | इतर खर्चापोटी गंगाजळी | 10,000 | 8,000 | 3,000 |

**आ) 25 ते 39 पर्यंत विद्यार्थी संख्या असल्यास**

| क्र. | तपशिल | ‘अ’ | ‘ब’ | ‘क’ |
|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षक/शिक्षिका मानधन प्रती माह (12 महिने) | 5,000 | 4,500 | 3,000 |
| 2 | जागा किराया प्रती माह (12 महिने) | 7,000 | 4,500 | 2,000 |
| 3 | दायी (काम करण्यासाठी) | 1,500 | 1,200 | 1,000 |
| 4 | खेळणी, रंग प्रती वर्ष | 4,000 | 3,000 | 2,000 |
| 5 | जाहिरात | 4,000 | 3,000 | 2,500 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | शैक्षणिक साहित्य प्रती विद्यार्थी | 200 | 150 | 100 |
| 7 | इतर खर्चापोटी गंगाजळी | 4,000 | 3000 | 3,000 |

**इ) 24 व त्यापेक्षा कमी विद्यार्थी संख्या असल्यास**

**विद्यार्थी संख्या कमी असल्या कारणांमुळे एकुण जमा फिसच्या 75 टक्के रक्कम शिक्षकास देण्यात येईल. सदरील रक्कमेमधुन सर्व खर्च भागविण्याची जबाबदारी शिक्षकाची राहिल.**

**ई) प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी अपेक्षित फिस :**

| वर्गवारी | 'अ' | 'ब' | 'क' |
|---|---|---|---|
| **फिस प्रती विद्यार्थी** | 8000 | 6000 | 3900 |
| **डोनेशन प्रती विद्यार्थी** | 800 | 600 | 300 |

25) सदरील युनिटमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची (शिकवणी वेळेत) काळजी घेण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित कर्मचा-याची राहिल.

26) काही अपरिहार्य कारणात्सव शिक्षकाने मध्येच शाळा बंद करावयाची असल्यास शिक्षकाने किमान 3 महिने पुर्वी (अगोदर) कंपनीचे संचालक, गुरुकिल्ली यांच्याकडे लेखी स्वरुपात अर्ज करणे आवश्यक राहिल.

27) एखादा शिक्षक कंपनीची पुर्व परवानगी न घेता 7 दिवसा पेक्षा गैर हजर राहिल्यास. बालकांच्या व स्वत:च्या होणा-या नुकसानास तो स्वत: जबाबदार राहिल. यामध्ये कंपनी कसल्याही प्रकारे हस्तक्षेप करणार नाही.

28) कोणत्याही कर्मचा-यास आपल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिना पूर्व सूचना देणे आवश्यक राहिल.

29) शिक्षकास रजा घ्यावयाची असल्यास असल्यास कंपनीची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल, सदरील कालावधी मध्ये Gurukilli Pre – Primary school **(Nursery, LKG, UKG)** वर नियंत्रण ठेवण्यासाठी, विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी किमान 12 वी पास या शैक्षणिक पात्रतेचा व्यक्ती उपलब्ध करावा लागेल.

30) कंपनीच्या माध्यमातुन सर्व कर्मचारी हे विशिष्ठ कालावधीसाठी नियुक्त करण्यात येत असल्यामुळे **'औद्योगिक विवाद कायदा'** अंतर्गत नुकसान, घाटा, भरपाई, ताटेबंद व इतर किंवा या प्रकारचे कोणतेही अधिनियम किंवा सदरील अधिनियमातील एखादी तरतुद, भाग लागु राहणार नाही.

31) कोणत्याही कर्मचा-याची कंपनीच्या आवशक्ते नुसार आवश्यक त्या ठिकाणी पदस्थापना करण्याचा, बदली करण्याचा अधिकार कंपनीकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

32) कंपनीच्या व कर्मचा-यांच्या हितासाठी कोणत्याही वेळी सदरील नियम बदलण्याचा, भाषा बदलण्याचा, काही नियम नष्ट करण्याचा किंवा नविन नियमांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार हा संचालक, गुरुकिल्ली ॲकॅडमी प्रा. लि. यांनी राखुन ठेवला आहे. याची रितसर कल्पना / माहिती कंपनीच्या माध्यमातुन शिक्षक धारकांना देण्यात येईल.

33) **या भरतीप्रक्रीये संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास सदरील वाद मुख्य कार्यालय, बीड येथे तीन सदस्यीय समितीच्या दालनात सोडविण्यात येईल, समितीचा निर्णय हा अंतिम राहिल. यात कोणत्याही उमेदवाराला न्यायालयात दाद मागता येणार नाही.**

- खालील अधिनियम हे कंपनीच्या कर्मचा-यांना लागु राहणार नाहीत.
  - अपदान संतान अधिनियम
  - औद्योगिक विवाद अधिनियम
  - प्रस्तूति प्रसुविधा अधिनियम
  - न्यूनतम मजदुरी अधिनियम

- व्यवसाय संघ अधिनियम
- औद्योगिक नियोजन अधिनियम
- मजदुरी संदाय अधिनियम
- असंघटित कर्मकार सामाजिक सुरक्षा अधिनियम
- युध्द क्षति (प्रतिकार बीमा) अधिनियम
- बोनस संदाय अधिनियम
- कर्मचारी भविष्य निधी और कुटुंब पेन्शन निधी अधिनियम
- कर्मचारी राज्य बीमा अधिनियम
- इतर सर्व कंपनी अधिनियम

**सूचना :-**

१) ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांनी दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज

२) दि. 30 मार्च, 2018 पर्यंत **संचालक, गुरुकिल्ली अॅकॅडमी प्रा. लि., शाहु नगर, हनुमान मंदिर रोड, नवजीन शिक्षक पतसंस्था दुसरा मजला, ता. जि. बीड. फोन** 02442 – 22122 / 233393 या पत्यावर पाठवावेत. ज्यांनी अर्ज ऑनलाईन केले आहेत त्यांनी अर्ज पोस्टाने पाठविण्याची आवश्यकता नाही. **अर्जासोबत कोणतेही कागदपत्र जोडू नयेते. मात्र चलन बँकेत डिपॉडीट केल्याची मुळ प्रत जोडणे आवश्यक आहे.**

## Pre - Primary school फ्रान्चायजी सुरु करण्यासाठीचे नियम व अटी भाग – 2

1) Gurukilli Pre – Primary school **(Nursery, LKG, UKG)** फ्रान्चायजी सुरु करण्यासाठीचा करार हा तीन वर्ष कालावधीसाठी राहिल.
2) फ्रान्चायजी धारक हा कंपनीचा संबंधित शाखा/शाळेपुरता व्यवसाय भागीदार म्हणुन राहिल.
3) यासाठी फ्रान्चायजी फिस ही 10,000 /- रु. राहिल. (ना परतावा)
4) तथपि मोबदला म्हणुन (रुपयामध्ये) प्रतीवर्ष विद्यार्थ्यांच्या फिस मधुन जमा झालेल्या रक्कमेतुन 50 टक्के वाटा आपला राहिल तथा 50 टक्के वाटा हा कंपनीचा राहिल.
5) **सदरील Gurukilli Pre – Primary school (Nursery, LKG, UKG) शाळेवर कंपनीच्या माध्यमातुन शहरीभागासाठी प्रती 60 विद्यार्थ्यांसाठी दोन शिक्षक/शिक्षिका मानधन तसेच एक शिपाई मानधन, रंग-रंगोटी खर्च, विद्यार्थ्यांना वहि-पुस्तक, पेन- पेन्सील कंपनीकडून देय राहिल.**
6) विद्यार्थ्यांच्या प्रवेशापोटी फ्रान्चायजी धारकास जाहिरातीचे साहित्ये जसे बॅनर, सर्व्हे फॉर्म, पॉम्प्लेट पोस्टर आपणांस नियमाप्रमाणे कंपनीकडून देण्यात येतील, परंतु वितरणाचा खर्च हा आपणांस करावा लागेल.
7) सदरील सर्व खर्च हा कंपनीच्या माध्यमातुन भाग 1 मधिल नियम 23/24 (ई) अन्वये विद्यार्थ्यांकडून जमा झालेल्या फिस मधुन करण्यात येईल.
8) सदरील केंद्रामध्ये काही गैर व्यवहार आढळल्यास, वेळ प्रसंगानुसार किंवा काही अपरिहार्य कारणात्सव सदरील Gurukilli Pre – Primary school (Nursery, LKG, UKG) बंद करण्याची वेळ कंपनीवर आल्यास सदरील केंद बंद करुन कोणत्याही प्रकारचा मोबदला फ्रान्चायजी धारकास देणे बंधनकारक राहणार नाही.

9) सदरील Gurukilli Pre – Primary school (Nursery, LKG, UKG सुरु करण्यासाठी लागणारा अत्यावश्यक खर्च जसे जागेचा किराया, फर्निचर, वीजबील, फोनबील, पर्यवेक्षक / पयवेक्षिका, इतर कर्मचारी मानधन व इतर खर्च हा खर्च फ्रान्चायज धारकास करावा लागेल.

10) शाळेवर विद्यार्थी संख्या कमी अधिक झाल्यास सदरील सर्व खर्च हा कंपनीच्या माध्यमातुन भाग - 1 मधिल नियम 23/24 (ई) अन्वये करण्यात येईल.

11) विद्यार्थ्याना / पालकांना शाळेसाठी आवश्यक असलेले कपडे, बुट, सॉक्सचा खर्च स्वत: करावा लागेल.

12) कंपनीच्या माध्यमातुन सर्व कर्मचारी हे विशिष्ठ कालावधीसाठी नियुक्त करण्यात येत असल्यामुळे **'औद्योगिक विवाद कायदा'** अंतर्गत नुकसान, घाटा, भरपाई, ताटेबंद व इतर किंवा या प्रकारचे अधिनियम लागु राहणार नाहीत.

**मुलाखत :- 1) महाराष्ट्र राज्यातील सर्व मुलाखतीसाठी उमेदवारास आपल्या जवळचे ठिकाण फोन SMS द्वारे तात्काळ कळविण्यात येईल.**

**2) गोवा राज्यातील मुलाखती या त्याच राज्यात होतील.**

संपर्क

**संचालक, गुरुकिल्ली अॅकॅडमी प्रा. लि.**

फोन 02442- 221122 / 233393

मो. 9422060303

सूचना : मोबाईलवर संपर्क न झाल्यास SMS करावा, ही विनंती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 01 विश्वसनिय नांव गुरुकिल्ली . . . | 08 वर्ष | 49 शाखा | 247 कर्मचारी | 35000 + विद्यार्थी |

# GURUKILLI ACADEMY, BEED. INDIA

## ------------ पदाच्या नियुक्तीसाठी नमुना अर्ज

**कार्यालयीन वापरासाठी**

संगणक सांकेतांक क्रमांक : ----------------------------------------------------------------------

अर्ज प्राप्त दिनांक : ------------------------------------------------------------------------

अर्ज न स्वीकारण्याचे कारण ----------------------------------------------------------------------

अर्ज तपासणा-या कर्मचा-याचे नांव : -----------------------------------------------------------

स्वाक्षरी

संस्थाचालकाचा फोटो

स्वाक्षरी

**सूचना :- संपूर्ण अर्ज मराठी भाषेतच लिहावा.**

प्रति,

**मा. संचालक,**
गुरुकिल्ली ॲकॅडमी प्रा. लि.,
शाहू नगर, हनुमान मंदिर रोड,
नवजीवन शिक्षक पतसंस्था दुसरा मजला,
बीड.

01) नियुक्ती हवी असलेले ठिकाण :- -------------- ता. ------------- जिल्हा ------------

02) संपूर्ण नांव (श्री/श्रीमती) :- ----------------------------------------------------------------

03) संपूर्ण पता :- ----------------------------------------------------------------

तहसिल --------------------- जिल्हा -----------------------------

पीन कोड -------------- राज्य ------------------------------------

फोन क्रमांक (एसटीडी कोड) ---------------- मोबाईल -------------------------------------

ई-मेल (अनिवार्य) --------------------------- @ --------------------------

05) आपण अपंग आहात काय ? (योग्य ठिकाणी ✓निशानी) होय ☐ नाही ☐

जर होय असल्यास स्पष्टीकरण द्या. -------------------------------------

06) आपण स्वातंत्र सैनिक आहात काय ? (योग्य ठिकाणी ✓निशानी) होय ☐ नाही ☐

07) जन्म दिनांक ☐☐ दिवस ☐☐ महिना ☐☐☐☐ वर्ष

08) अर्जदाराचे लिंग पुरुष ☐ महिला ☐ (योग्य ठिकाणी ✓निशानी)

09) राष्ट्रीयत्व : -------------------------------------------------------------

10) जन्म ठिकाण : ठिकाण ------------- जिल्हा ------------ राज्य -----------

**12) शैक्षणिक पात्रता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण परीक्षा | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा महिना | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

13) शिकविण्याचा अनुभव आहे काय ?

| अ.क्र. | संस्थेचे नांव | पद | सेवा कालावधी | | एकुण सेवा | सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिना | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

14) भाषेचे ज्ञान : (योग्य ठिकाणी ✓निशानी )

| अ.क्र. | भाषा | लिहिणे | बोलणे | वाचणे |
|---|---|---|---|---|
| 1 | मराठी | | | |
| 2 | ENGLISH | | | |
| 3 | हिंदी | | | |

उपरोक्त अर्जामध्ये दिलेली संपूर्ण माहिती माझ्या माहिती प्रमाणे सत्य आहे.

**गुरुकिल्ली अॅकॅडमी द्वारा देण्यात येणा-या सर्व नियम व अटीं पाळणे हे मला मान्य असून, त्या पाळणे माझ्यावर बंधनकारक राहतील.**

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :- संपूर्ण नांव :- -----------------------------

*** नियम व अटी लागु**